महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः आकृवि-०५१९/प्र.क्र.१२३(२५)/१५ अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ३२.
तारीख: १४ जून, २०१९.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील कलम ४(१),४(२),४(३) व कलम ५(१)(क) मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने नियतकालिक बदलीस पात्र असलेल्या या विभागातील उप संचालक, महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे बदलीने पदस्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. खालील अधिकारी हे सर्वसाधारण बदलीस पात्र होते, परंतु काही अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाल्यामुळे प्रस्तुतचे आदेश विहित कालावधीत निर्गमित करता आलेले नाहीत. त्या अनुषंगाने बदली अधिनियमातील कलम ४(४) (दोन) व ४(५) मधील तरतुदीनुसार वरिष्ठ सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने प्रस्तुत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

अधिका-यांचे नांव व सध्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना
श्री.खैरनार सुनिल मारूती, कृषि विकास अधिकारी, जि.प.पुणे	उपविभागीय कृषि अधिकारी, पुणे, जि.पुणे. (श्री.भोर यांच्या दि.३०/०६/२०१९ रोजी सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदी.)

२. उपरोक्त अधिका-यांनी आपल्या पदाचा कार्यभार समकक्ष वा नजीकच्या कनिष्ठ अधिकाऱ्याकडे सोपवून नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे व तसा अहवाल आयुक्त (कृषि), यांच्यामार्फत शासनास सादर करावा. तसेच त्यांनी सध्याच्या पदावरुन कार्यमुक्त झाल्यानंतर दरम्यानच्या कालावधीमध्ये अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्या अनुषंगाने त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीडीआर-१०८२/२५७६/२८/११, दिनांक ३०.०८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन पून्हा बदली करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

३. संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांच्या बदलीच्या जागी रुजू होण्यास सांगावे. जे नियंत्रण अधिकारी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना विहित मुदतीत कार्यमुक्त करणार नाही, अशा अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव आयुक्त (कृषि) यांनी शासनास सादर करावा.

४. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील हे कृपया पहावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१४१६२२००९२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.06.14 16:12:10 +05'30'

(सु.सं.धपाटे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
६. संबंधित विभागीय कृषि सह संचालक/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
७. कृषि सह संचालक, (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
९. संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
१०.निवड नस्ती /१५अे.